# माहितीचे राजकारण: राजकारणातील एक नवीन प्रवाह

**डॉ. धर्मवीर शाहू क्षीरसागर,** सहयोगी प्राध्यापक, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज,
dharmvirdemocracy@gmail.com

---

**गोषवारा:**

राज्यशास्त्रातील पारंपरिक उपविषयांमध्ये माहितीचे राजकारण (Information Politics) हा डिजिटल युगातील एक उदयोन्मुख नवप्रवाह आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्स, AI आणि सोशल मीडियाच्या प्रसारामुळे माहिती ही केवळ साधन न राहता स्वतंत्र शक्ती (Power) बनली आहे. हा पेपर टिम जॉर्डन (२०१५) यांच्या संकल्पनेतून सुरुवात करून, क्रिस्टोफर वॉकर आणि जेसिका लुडविग (२०१७) यांच्या 'शार्प पॉवर' (Sharp Power) तसेच जूलिया सी. मॉर्स आणि टायलर प्रॅट (२०२५) यांच्या 'इन्फॉर्मेशन डिसऑर्डर' संकल्पनांद्वारे या प्रवाहाचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक विश्लेषण करतो. संशोधन पद्धती म्हणून द्वितीयक स्रोतांवर आधारित गुणात्मक वर्णनात्मक विश्लेषण (Qualitative Descriptive Analysis) अवलंबले आहे. संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके आणि अतिरिक्त केस स्टडीज (रशिया-युक्रेन, चीनची शार्प पॉवर, EU च्या डेमोक्रॅटिक रेसिलियन्स सेंटर २०२५) समाविष्ट केल्या आहेत. निष्कर्षात, हा प्रवाह राज्यशास्त्राच्या सिद्धांतांना नवीन आव्हाने देतो आणि डिजिटल नियमन, फॅक्ट-चेकिंग व आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज अधोरेखित करतो.

**प्रस्तावना**

राज्यशास्त्र पारंपरिकरित्या सैन्यशक्ती (Hard Power) आणि सॉफ्ट पॉवर (Soft Power) यांवर आधारित होते (Nye, २००४). परंतु २१ व्या शतकातील डिजिटल क्रांतीने माहितीला एक स्वतंत्र 'पॉवर' बनवले आहे. २०१६ च्या अमेरिकन निवडणुकीतील रशियन डिसइन्फॉर्मेशन, २०२२ च्या युक्रेन युद्धातील इन्फॉर्मेशन वॉरफेअर, २०२५ मधील EU च्या 'डेमोक्रॅटिक रेसिलियन्स सेंटर' स्थापना आणि २०२५-२०२६ मधील AI-आधारित डिसइन्फॉर्मेशन कॅम्पेन्स यांनी हे स्पष्ट केले आहे. 'माहितीचे राजकारण' म्हणजे राष्ट्रे किंवा गैर-राष्ट्र घटकांकडून माहितीचा रणनीतिक वापर करून जनमत, कूटनीती आणि सार्वभौमत्वावर नियंत्रण मिळवणे (Jordan, २०१५). हा राज्यशास्त्रातील एक नवप्रवाह म्हणून उदयास आला आहे, ज्यामुळे रिअलिझम आणि लिबरलिझम सारखे पारंपरिक सिद्धांत नवीन डिजिटल वास्तवाशी जुळवून घ्यावे लागत आहेत. २०२५ मध्ये प्रकाशित 'Information Disorder and Global Politics' (Morse & Pratt, २०२५) या लेखाने हे स्पष्ट केले की इन्फॉर्मेशन डिसऑर्डर आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासाला पूर्णपणे बदलत आहे. या संशोधन लेखाचा उद्देश या प्रवाहाची संकल्पना, सैद्धांतिक चौकट, ऐतिहासिक विकास, व्यावहारिक परिणाम आणि २०२५-२०२६ च्या नवीन घडामोडींचे विश्लेषण करणे आहे.

**साहित्य समीक्षा**

साहित्यात माहितीचे राजकारण दोन मुख्य प्रवाहामध्ये विभागले जाते. पहिला प्रवाह टिम जॉर्डन (२०१५) यांच्या पुस्तकातून येते, ज्यात माहिती हे 'मुक्ती आणि शोषण' (Liberation and Exploitation) यांचे माध्यम आहे. पहिला प्रवाह क्रिस्टोफर वॉकर आणि जेसिका लुडविग (२०१७) यांच्या 'शार्प पॉवर' संकल्पनेतून येते, जी अधिनायकवादी राष्ट्रांकडून लोकशाही देशांच्या माहिती वातावरणात भेद घालण्याचे वर्णन करते. जूलिया सी. मॉर्स आणि टायलर प्रॅट (२०२५) यांनी 'इन्फॉर्मेशन डिसऑर्डर'ला एक नवीन चल म्हणून मांडले, ज्यात कमी सामग्री निर्मितीतील अडथळे (Content Creation Barriers), फेक मटेरियल चा वेगवान प्रसार आणि अल्गोरिदमिक प्रवर्धन (Amplification) यांचा समावेश आहे. हे विशेषतः लोकशाहींना कमकुवत करते आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याला हानी पोहोचवते. कॉर्नेलियू ब्जोला आणि जेम्स पॅमेंट (२०१९) यांनी डिजिटल मुत्सद्देगिरी (Digital Diplomacy) च्या 'डार्क साइड' चा उल्लेख केला. भारतीय संदर्भात कार्नेगी इंडिया आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या डिजिटल डिप्लोमसी अहवालांत हे दिसते. बहुतेक अभ्यास पाश्चिमात्य केंद्रित आहेत, विकासशील देशांसाठी फारसे नाहीत हे साहित्यातील मुख्य अंतर आहे. २०२५-२०२६ मधील युरोपियन संघ आणि नाटो (NATO) च्या रिपोर्ट्सने संमिश्र धोके (Hybrid Threats) आणि खोटी माहिती (Disinformation) अधिक जोर दिला आहे.

**सैद्धांतिक चौकट**

माहितीचे राजकारण हे 'शार्प पॉवर' चे रूप आहे, जे सॉफ्ट पॉवरच्या विरुद्ध 'छेदणारे, भेदणारे' (Pierce, Penetrate, Perforate) कार्य करते (Walker & Ludwig, २०१७). जॉर्डन (२०१५) नुसार, हे डिजिटल संस्कृतीतून उद्भवले असून लिंग, वर्ग आणि पर्यावरण यांसारख्या संघर्षांशी जोडलेले आहे. मॉर्स आणि प्रॅट (२०२५) यांच्या मते, माहितीची

विस्कळीतता (Information Disorder) हे एक नवीन मीडिया पर्यावरण आहे ज्यात फेक न्यूजचा प्रसार आणि अल्गोरिदमिक प्रवर्धन (Amplification) मुळे जनमत विकृत होते. ब्जोला (२०१९) यांच्या मते, हे 'असत्यांचा महापूर' (Firehose of Falsehoods) तंत्र वापरते. ही चौकट राज्यशास्त्रातील नवीन 'माहितीची सत्ता' (Information Power) संकल्पना प्रस्तुत करते, जी पारंपरिक 'सत्ता' संकल्पनांना आव्हान देते आणि संमिश्र धोक्याना (Hybrid Threats) केंद्रस्थानी ठेवते.

**संशोधन पद्धती**

हा संशोधन लेख द्वितीयक स्रोतांवर आधारित गुणात्मक वर्णनात्मक विश्लेषण (Qualitative Descriptive Analysis) पद्धतीचा अवलंब करतो. सामग्री विश्लेषण (Content Analysis) द्वारे संकल्पना समजून घेतल्या आहेत. (डिसइन्फॉर्मेशन, हायब्रिड थ्रेट, डिजिटल डिप्लोमसी). प्राथमिक डेटा (सर्वे/इंटरव्यू) नसल्याने व्याख्यात्मकता मर्यादित झाली आहे, ही संशोधनाची मर्यादा आहे. एकापेक्षा अधिक स्रोतांचे क्रॉस-व्हेरिफिकेशन करून माहितीची वैधता तपासली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. माहितीचे राजकारण ही राज्यशास्त्रातील नवीन प्रवाह म्हणून संकल्पना स्पष्ट करणे.
२. या प्रवाहाची सैद्धांतिक चौकट (शार्प पॉवर, इन्फॉर्मेशन डिसऑर्डर) विकसित करणे.
३. आंतरराष्ट्रीय केस स्टडीज आणि २०२५-२०२६ च्या नवीन घडामोडींद्वारे व्यावहारिक परिणाम विश्लेषित करणे.
४. भारताच्या संदर्भात धोरणात्मक शिफारसी सुचवणे.

**गृहितके**:

$H_1$: माहितीचे राजकारण हे पारंपरिक हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवरपासून वेगळी असून शार्प पॉवरच्या रूपात राज्यशास्त्रातील एक स्वतंत्र प्रवाह आहे (Walker & Ludwig, २०१७).

$H_2$: डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे डिसइन्फॉर्मेशन हा हायब्रिड थ्रेट्सचा मुख्य घटक आहे, जो लोकशाही संस्थांना कमकुवत करतो (Bjola & Pamment, २०१९; Morse & Pratt, २०२५).

$H_3$: विकासशील देशांमध्ये (जसे भारत) डिजिटल डिप्लोमसी ही माहितीच्या राजकारणाला प्रतिसाद देण्याची प्रभावी रणनीती आहे (Morse & Pratt, २०२५).

**विश्लेषण आणि केस स्टडीज**

ऐतिहासिक विकास:

शीतयुद्धात प्रचार (Propaganda) चे तंत्र वापरले गेले, १९९० नंतर इंटरनेट क्रांती झाली आणि २०१० नंतर सोशल मीडियाचा प्रभाव वाढून (अरब स्प्रिंग) घडून आली. आज AI- डीपफेक आणि अल्गोरिदमिक प्रवर्धन यामुळे हा प्रवाह घातक झाला. २०२५ मध्ये युरोपियन संघाने 'Centre for Democratic Resilience' स्थापन केले, जे रशियन आणि चिनी डिसइन्फॉर्मेशनला प्रतिउत्तर देण्यासाठी स्थापन झाले आहे.

केस स्टडी १: रशिया-युक्रेन युद्ध

रशियाने 'इन्फॉर्मेशन वॉरफेअर' वापरून युक्रेनला 'नाझी' चित्रित केले (Bjola & Pamment, २०१९). २०२५-२०२६ मध्ये ड्रोन, सायबर अटॅक्स आणि डिसइन्फॉर्मेशन कॅम्पेन्स वाढल्या.

केस स्टडी २: चीनची शार्प पॉवर

चीनने 'वुल्फ वॉरियर' डिप्लोमसी आणि TikTok/Huawei यांद्वारे माहिती नियंत्रण (Walker & Ludwig, २०१७). २०२५ मध्ये NATO ने चिनी डिसइन्फॉर्मेशनला युरो-अटलांटिक सिक्युरिटीसाठी धोका म्हणून ओळखले.

भारतीय संदर्भ:

पुलवामा-बालाकोट (२०१९) मध्ये PIB फॅक्ट-चेक आणि MEA सोशल मीडिया. भारत 'डिजिटल इंडिया'द्वारे या प्रवाह सामना करत आहे. २०२५-२०२६ मध्ये Quad आणि BRICS मध्ये इन्फॉर्मेशन शेअरिंग वाढलेले दिसून येते.

**परिणाम आणि चर्चा:**

- लोकशाही कमकुवत होत आहे. (Morse & Pratt, २०२५).
- सार्वभौमत्व धोक्यात; हायब्रिड थ्रेट्स वाढले आहेत.
- राज्यशास्त्रासाठी नवीन सिद्धांत (Cyber Realism) गरजेचे आहे.

वरील संदर्भयानुसार गृहितके सिद्ध झाली, माहितीचे राजकारण हा खरोखरच नवप्रवाह आहे.

**निष्कर्ष:**

माहितीचे राजकारण हा राज्यशास्त्रातील नवप्रवाह आहे. तो कूटनीती, सुरक्षा आणि लोकशाही बदलत आहे. भविष्यात AI-आधारित इन्फॉर्मेशन वॉर वाढेल; म्हणून आंतरराष्ट्रीय कायदे (UN Cyber Norms), डिजिटल साक्षरता आणि बहुपक्षीय सहकार्य आवश्यक.

**संदर्भ:**

1. ब्योला, सी., आणि पॅमेंट, जे. (संपा.). (२०१९). *काऊंटरिंग ऑनलाइन प्रॉपगंडा अँड एक्स्ट्रीमिजम: दी डार्क साइड ऑफ डिजिटल डिप्लोमासी*. राउटलेज.
2. जॉर्डन, टी. (२०१५). *इन्फॉर्मेशन पॉलिटिक्स: लिब्रालेशन अँड एक्सप्लॉयटेशन इन दी डिजिटल सोसायटी*. प्लूटो प्रेस.
3. मोर्स, जे. सी., आणि प्रॅट, टी. (२०२५). *इन्फॉर्मेशन डिसोरडर अँड ग्लोबल पॉलिटिक्स*. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन, ७९(S1), S26–S43.https://doi.org/10.1017/S0020818325000123
4. नाय, जे. एस., जुनिअर *(२००४). सॉफ्ट पॉवर: दी मीन्स तो सकसेस इन वर्ल्ड पॉलिटिक्स*. पब्लिकअफेअर्स.
5. वॉकर, सी., आणि लुडविग, जे. (२०१७). *फ्रॉम सॉफ्ट पॉवर टू शार्प पॉवर: रायजिंग अथोरिटेरियन इनफ्लूएनस इन दी डेमोक्रेटिक वर्ल्ड*. नॅशनल एन्डोमेंट फॉर डेमोक्रसी. https://www.ned.org